Rs.३०००/-

आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड

gac.nanded@gmail.com

Phone: ०२४६२-२३४०२६

-कार्यालय-

अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड

पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या शेजारी, वजिराबाद, नांदेड-४३१६०१.

Phone: ०२४६२-२३४०२६

Website:http//www.mahatenders.gov.in

Email: gac.nanded@gmail.com

Phone: ०२४६२-२३४०२६

E-Tender for supply of

अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड येथील स्वच्छता सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबत.

Not Transferable

निविदा संदर्भ क्र :ई-निविदा क्रं./शाआमनां/लेखा/स्वच्छता सेवा/2676/२०२२-२०२३.

निविदा ऑनलाईन सादर करण्यांचा कालावधी

दिनांक२५/०७/२०२२ ते दि.०६/०८/२०२२ (०५.०० सायं वाजेपर्यंत)

## अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, आयुर्वेदिक व युनानी रसशाळा नांदेड

अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांच्या अधिनस्त महाविद्यालयाची इमारत, पदवी / पदव्युत्तर मुलां मुलींचे वसतिगृह, ग्रंथालय, रसशाळा, ॲनिमल हाऊस येथे अवैद्यकीय पुरक सेवा पुरविणे करीता दोन लिफाफा पध्दतीने पात्र व इच्छुक निविदा धारकाकडून निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | कामाचे वर्णन | कालावधी | निविदेची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रसशाळा, नांदेड येथे क्षेत्रफळाप्रमाणे स्वच्छता सेवा पुरविणे. | ११ महिने | ५०,००,०००/- | ५००००/- |

वरील सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविण्या करिता मान्यता प्राप्त व इच्छुक कंत्राटदारा कडून दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यांत येत आहेत. नियम व अटींच्या पुर्ततेसह आपली निविदा Website:http//www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावरुन दिनांक २५/०७/२०२२ ते दिनांक ०६/०८/२०२२ चे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी डाऊनलोड करावयाचे आहेत रक्कम रुपये ३०००/- (निविदा फॉर्म किंमत ) व बयाना रक्कम (ईएमडी) रुपये ५०,०००/- या सदर दोन्ही रक्कमा ऑनलॉईन पध्दतीने उपलब्ध असलेल्या पर्यायातून जमा करावी लागेल ( Should be paid as available payment on mahatenders.gov.in ) इतर कोणत्याही पध्दतीने रक्कम स्विकारली जाणार नाही. शपथपत्र. (प्रपत्र-४), मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र, प्रपत्र-१ व तांत्रिक लखोटयात मागणी केलेल्या सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रतीसह ऑनलॉईन पध्दतीने अपलोड करणे बंधनकारक आहे. सदर निविदा प्रक्रियेचा कालावधी खालील प्रमाणे आहे.

| Name of Tender | Tender Publish date | Submission End date | Technical Bid opening date | प्री-बीड मिटींग |
|---|---|---|---|---|
| स्वछता सेवा (क्षेत्रफळा प्रमाणे) | २५/०७/२०२२ | ०६/०८/२०२२ वेळ सायं. ०५.०० वाजेपर्यंत | १०/०८/२०२२ ते वेळ११.०० वाजता (तांत्रिक अडचण न आल्यास) | दि.०२/०८/२०२२ |

सदर निविदा :http//www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर भरावयाच्या आहेत.

पात्रतेचे निकष:-

०१) निविदा धारकाची प्रति वर्षी उलाढालाची रक्कम रुपये ५०,००,०००/- ( अक्षरी रुपये पन्नास लाख फक्त) किंवा त्यापेक्षा जास्त उलाढाल असलेले निविदा धारक पात्र ठरु शकतात. (२०१९-२०,२०२०-२१,२०२१-२२)

०२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र /शॉप ॲक्ट प्रमाणपत्र

०३) निविदा धारकांनी मागील तीन वर्षाचे २०१९-२०,२०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षात केलेली उलाढाल सनदी लेखापाल यांचेकडून प्रपत्र -३ नुसार प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे. तसेच मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र (२०१९-२०,२०२०-२१ व २०२१-२२) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र ०३ मध्ये कुठल्याही प्रकारचे बदल करण्याची परवानगी राहणार नाही.

०४) GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

०५) दि. ०१-०४-२०१९ ते दि.३१.०३.२०२०, दि. ०१-०४-२०२० ते दि.३१.०३.२०२१, व दि०१-०४-२०२१ ते दि.३१.०३.२०२२ अखेर GSTभरलेल्या चलनांच्या प्रती.

०६) मागील तीन वर्षात प्रतिवर्षी निविदा धारकांने शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णालये तसेच शैक्षणिक संस्था, महामंडळे या संस्थेत स्वच्छता सेवा व रुग्णसेवा समाधानकारक पुरविले बाबत पुर्वानुभवाची तपशिलवार माहित्ती संबधित संस्थेच्या लेटरहेडवर संस्था प्रमुखांची स्वाक्षरी व संस्थेच्या शिक्यासह दयावी. ( प्रपत्र-२ प्रमाणे )

०७) निविदाधारकाने मागील तीन वर्षात (प्रतिवर्षी) किमान १,००,००० चौ.फुटाच्या ईमारतीस स्वच्छता सेवा पुरविल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

०८) संस्थेचे कर्मचारी भविष्य निर्वाह निधीबाबतचे रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट

०९) संस्थेचे वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र ( पॅन नंबर )

१०) संस्थेचे लेबर लायसन्स

११) संस्थेचे ESIC नोंदणी प्रमाणपत्र

१२) ESIC ची ठेकेदाराकडे नोंदणीकृत स्वच्छता कर्मचा-यांचे ऑनलाईन पध्दतनीने भरलेल्या चलनाची प्रत आवश्यक आहे.

१३) महाराष्ट्र कामगार कल्याण बोर्ड यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र व मागील वर्षातील चलन २०२१-२०२२

१४) PF ची ठेकेदाराकडे नोंदणीकृत स्वछता करणा-या कर्मचा-याचे ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या चलनाची प्रत आवश्यक ( सन २०२१-२२ ).

१५) रु.५,००,०००/- ची ( अक्षरी पाच लाख फक्त ) राष्ट्रीयकृत/शेड्युल/जिल्हा बँकेचे मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र.

१६) निविदा धारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळ्या यादीत टाकलेले नाही. याबाबत निविदाधारकाने शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे. ( प्रपत्र-४ शपथपत्र करुन )

१७) सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत, संस्थांना निविदा भरावयाची असल्यास त्यांची सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे अनुमती पत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर संस्थेला बयाना रक्कम माफ असलेल्या बदल सक्षम प्राधिकरणाचे परिपत्रक जोडावे किंवा संबधित विभागाचे निविदा भरणा-या संस्थेच्या नावाच्या उल्लेख असलेले बयाना रक्कम माफ करणेविषयी अद्यावत प्रमाणपत्र जोडावे.

१८) शासन नियमानुसार कंत्राटदाराकडून आलेले दर हे प्रशासकीय खर्च किमान वेतन नियम व इतर लागु कामगार कायदे गृहित धरुन असावेत.

१९) निविदा धारकाडून नेमण्यांत आलेल्या कर्मचा-यांना किमान वेतन कायदा व इतर सर्व लाभ प्रचलित नियमानुसार कर्मचा-यांचे वेतन अदा करणे बंधनकारक राहील.

२०) काही तांत्रिक अडचणीमुळे निविदा नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता निविदा प्रक्रिया रद्द करणेचा अधिकार अधिष्ठाता,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांनी राखून ठेवलेला आहे.

२१) निविदाधारकाने प्रचलित कामगार कायद्यानुसार कंत्राटी कामगारांच्या वेतन, इपीएफ,इएसआयसी व इतर भत्ते भरण्याबाबत तसेच ऑनलाईन चलनाच्या प्रती दरमहा सादर होणा-या देयकासोबत दाखल करणे अनिवार्य आहे.

*तसेच कामगारांना किमान वेतनाप्रमाणे वेतन अदा केल्याचे प्रमाणपत्र प्रतीमहा सादर होणा-या देयकासोबत जोडणे अनिवार्य आहे.

*कामगारांच्या देय भत्त्याच्या चलनाची प्रत दरमहा देयकासोबत सादर न केल्यास त्या महिन्याचे देयक अदा करण्यात येणार नाही. व त्याची जबाबतदारी संबधित निविदा धारकाची राहील.विलंब झाल्यामुळे कामगाराचे निवेदन अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याबदलीची सर्व जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

*शासनाकडुन अनुदान उपलब्ध होइपर्यंत निविदाधारकाना कामगाराचे सर्व वेतन व भत्ते स्वखर्चातुन दयावे लागेल. याबाबत कोणतेही सबब ऐकुण घेतली जाणार नाही.

*कंत्राटी कामगाराचे वेतन त्यांच्या बँक खात्यात जमा केले असल्याचे दर्शविणारे बँक अधिका-याचे सहीचे विवरणपत्र आणि कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक हजेरी पुस्तकासह निविदाधारकाने दरमहा कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.जोपर्यंत निविदाधारक वरील कागदपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे निविदाधारकाचे देयक अदा करण्यात येणार नाही.

२२) निविदाधारकास सुरक्षाठेव ( Security Deposite ) रु. १,५०,०००/- (अक्षरी एक लाख पन्नास हजार फक्त ) अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांचे नांवे धनाकर्षाव्दारे भरणे आवश्यक आहे. उपरोक्त कामासाठी अनामत रक्कम भरल्यानंतर आपणांस महाविद्यालय व शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळा, नांदेड यांचे सोबत ठरवून दिलेल्या कामाचा करारनामा स्वतंत्रपणे करुन द्यावा लागेल. सदरील अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय राहणार नाही.

२३) निविदेची मुदत संपेपर्यंत काम समाधानकारक केल्यास अनामत रक्कम निविदेची मुदत संपल्यानंतर आपणांस परत करण्यांत येईल. समाधानकारक कामाबदल (स्वच्छता सनियंत्रण समितीच्या शिफारशीसह ) सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्धवट काम सोडून गेल्यास आपणांस कोणत्याही प्रकारचा मोबदला दिला जाणार नाही. तसेच स्वच्छता सेवेत अडथळा निर्माण झाल्यास दिलेली निविदा रद्द करुन सदरील निविदाधारकांचे नांव काळ्या यादीत टाकले जाईल व अनामत रक्कम जप्त केली जाईल. त्याचप्रमाणे ज्या कामाची आपण वेळेवर व सुयोग्य प्रकारे पुर्तता केलेली नाही, ती कामे उपलब्ध बाहेरील एजन्सीकडून / मालकाकडून करुन घेवून त्याचा पुर्ण खर्च आपण दिलेल्या सुरक्षा ठेवीच्या रक्कमेतून वसुली केला जाईल.

२४) वेतनासंबधी कंत्राटी कामगारांच्या काही तक्रारी प्राप्त झाल्यास आणि त्या पडताळणी अंती योग्य असल्यास त्यापोटीचा खर्च निविदाधारकांच्या सुरक्षाठेव रक्कमेतुन वसुल केला जाईल.

२५) तसेच कंत्राटदाराने कामगारांचे वेतन व भत्ते, पीएफ व ईएसआयसी किमान वेतन कायद्यान्वये केले नसल्यास त्यांच्या सुरक्षाठेव रक्कमेतून वसुल केला जाईल.

२६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, इमारत, वस्तीगृह, ग्रंथालय, रसशाळा तसेच ॲनिमल हाऊस Toilet Building Area अशी वेगवेगळी विभागणी करुन क्षेत्रफळांची वेगवेगळी मापे तयार केलेली आहेत. त्यानुसार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रसशाळा यांचे सद्यस्थितीत कार्यान्वित भागाचे ( Corridor Area , Toilet Area, External Premises area, Built up Area ) क्षेत्रफळ स्केवर फुटामध्ये ६२१३०६.०२ Sq. Ft. असे आहे.

२७) निविधारकाने निविदा प्रक्रियेच्या लागणा-या सर्व कागदपत्रांसोबत रु. ५००/- च्या बॉन्डपेपरवर शपथपत्र सादर करणे व त्या सर्व मुद्यांचा उल्लेख करणे बंधनकारक राहील.

- निविदा धारकावर दखलपात्र गुन्हा नसावा.
- पुर्वीच्या सेवा देत असतांना निविदाधारकांवर कुठल्याही प्रकारची तक्रार किंवा कार्यवाही न झाल्याचे प्रमाणपत्र
- निविदाधारक शासकीय अथवा निमशासकीय संस्थेच्या काळया यादीत समाविष्ठ नसल्याचे शपथपत्र
- निविदे सोबत दाखल करण्यांत आलेली सर्व कागदपत्रे सत्य असनु ती खोटी असल्यास त्यास सर्वस्वी निविदाधारक स्वत: जबाबदार राहील.

निविदाधारकाची स्वाक्षरी

शिक्का .

**निविदा भरतांना निविदा धारकांस येणा-या खर्चाबाबत:-**

निविदा सादर करतांना येणा-या सर्व खर्चाची संपूर्ण जबाबदारी ही निविदाधारकांवर असेल त्याबाबत निविदाधारकांस प्रतिपूर्ती हक्क सांगता येणार नाही. तसेच सदरील निविदा प्रक्रिया रद्द झाली अथवा निविदा धारकांची निविदा नांमंजूर केली गेल्यास सदरच्या निविदे करीता निविदा धारकाकडून झालेल्या खर्चाची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

**निविदा प्रक्रियेबाबत स्पष्टीकरण:-**

निविदा प्रक्रियाबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबधित निविदाधारकांने अथवा निविदा भरु इच्छिणा-या निविदा पुर्व बैठकीपूर्वी लेखी स्वरुपात समितीच्या निदर्शनास आणुन देणे बंधनकारक राहील. कार्यालयाचा पत्ता ई-मेल

अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड
पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या शेजारी,
वजिराबाद, नांदेड-४३१६०१.
Email: gac.nanded@gmail.com

**निविदा प्रक्रियेतील बदलाबाबत:-**

०१) सक्षम प्राधिकारी हे निविदेमध्ये काही बदल करावयची असल्यास सदरच्या निविदेमधील अंतिम दिनांक वेळेपूर्वी शुध्दीपत्रकाव्दारे बदल करु शकतात.

०२) शुध्दीपत्रकाव्दारे निविदामधील बदल हे ग्राहय मानले जातील व सदरचे बदल हे निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहतील.

०३) प्रसिध्द केलेल्या शुध्दीपत्रकामुळे निविदा सादर करण्यास अतिरिक्त कालावधी वाढविण्याचा हक्क सक्षम प्राधिकरणने राखून ठेवला आहे. याबाबतची माहिती अधिकृत संकेत स्थळावरुन प्रसिध्द केली जाईल व ती माहिती निविदा भरु इच्छिणा-यांना लागू राहील.

**निविदा सादर करण्याबाबत :-**

निविदा ह्या विहीत मुदतीत दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. लखोटा क्रं. १ (तांत्रिक लखोटा) व लखोटा क्रं.२ (व्यापारी लखोटा) या पैकी एकही अपूर्ण लखोटा सादर केल्यास अथवा आवश्यक कादपत्रांची पुर्तता केलेली नसल्यास संबधिताची निविदा ना-मंजूर करण्यांत येईल.

उशिरा प्राप्त झालेल्या निविदाबाबत :-

उशिरा प्राप्त झालेल्या निविदा नाकारण्यांत येतील तसेच उशिरा सादर केलेल्या निविदाबाबतचे कोणतेही कारण ग्राहय मानले जाणार नाही. याबदल या कार्यालयाकडून कुठल्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

लखोटा क्रं. १ (तांत्रिक लखोटा) :-

तांत्रिक लखोटयामध्ये खालील कागदपत्रांची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

०१. बयाना रक्कम :-रक्कम रुपये ५०, ०००/- ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

०२. संस्था नोदणी प्रमाणपत्र / शॉप अॅक्ट प्रमाणपत्र ( सदर प्रमाणपत्रावर स्वच्छता सेवेचा उल्लेख असणे आवश्यक )

०३. निविदाधारकाची मागील तीन वर्षाची ( प्रती वर्षाची ) (२०१९-२०,२०२०-२१ व २०२१-२२) या वर्षातील उलाढाल सनदी लेखापाल यांचेकडून प्रपत्र ०३ नुसार प्रमाणित करुन सादर करणे आवश्यक आहे. तसेच मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र ( सन २०१९-२०,२०२०-२१ व २०२१-२२) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र ०३ मध्ये कुठल्याही प्रकारचे बदल करण्याची परवानगी नाही.

०४. मागील तीन वर्षाचा अॅडीट रिपोर्ट ( बॅलन्सशीट (ताळेबंद ), नफा- तोटापत्रक ( प्रॉफिट अॅन्ड लॉस स्टेटमेंट ) ची छायांकित प्रत )

०५. GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

०६. दि. ०१-०४-२०१९ ते दि.३१.०३.२०२०, दि. ०१-०४-२०२० ते दि.३१.०३.२०२१, व दि०१-०४-२०२१ ते दि.३१.०३.२०२२ अखेर GSTभरलेल्या चलनांच्या प्रती.

०७. मागील तीन वर्षात निविदा धारकांने शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णालये तसेच शैक्षणिक संस्था, महामंडळे स्वच्छता सेवा समाधानकारक पुरविलेबाबत पुर्वानुभवाची तपशिलवार माहिती दयावी. ( प्रपत्र-२ जोडावे.)

०८. मागील तीन वर्षात (प्रतिवर्षी ) किमान १,००,००० ( एक लाख) स्वेकर फुट ईमारतीस स्वच्छता सेवा पुरविल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

०९. प्रती वर्षी किमान सरासरी रु. ५०,०००००/- (अक्षरी पन्नास लाख रुपये केवळ) इतक्या रक्कमेच्या मुल्याचे स्वच्छता सेवेचे काम केल्याबाबतचे प्रमाणपत्र.

१०. भविष्य निर्वाह निधीबाबतचे रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट छायांकित प्रत .

११. आयकर नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत ( पॅन कार्डची छायांकित प्रत )

१२. आयकर विवरणप दाखल केल्याबदल ITR-V (मागील तीन वर्षाची)

१३. मागील तीन वर्षाचे व्यवसाय कर भरलेल्या चलनांची छायांकित प्रत.

१४. लेबर लायन्सस प्रमाणपत्र आवश्यक

१५. ESIC नोंदणी प्रमाणपत्र

१६. ESICची ठेकेदाराकडे नोंदणीकृत स्वच्छता कर्मचा-यांचे ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या चलनाची प्रत आवश्यक

१७. महाराष्ट्र कामगार कल्याण बोर्ड यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र व चालु वर्षातील चलनांची छायांकित प्रत

१८. PF ची ठेकेदाराकडे नोंदणीकृत स्वच्छता कर्मचा-यांचे ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या चलनाची प्रत आवश्यक

१९. रु. ५,००,०००/- ची ( पाच लाख रुपये फक्त ) राष्ट्रीयकृत/शेडयुल/जिल्हा बॅंकेचे मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्राची छायांकित प्रत ( निविदा धारकाने मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र निविदा अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. )

२०. मागील वर्षाचे PT Clearance Certificate

२१. निविदा धारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेले नाही. याबाबत निविदाधारकाने शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे. ( प्रपत्र-४ शपथपत्र करुन )

२२. सहकारी संस्था असल्यास ठरावाची प्रत, संस्थांना निविदा भरावयाची असल्यास त्यांची सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे अनुमती पत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच सदर संस्थेला बयाना रक्कम माफ असल्या बदल सक्षम प्राधिकरणाचे परिपत्रक जोडावे किंवा संबधित विभागाचे निविदा भरणा-या संस्थेच्या नावाच्या उल्लेख असलेले बयाना रक्कम माफ करणेविषयी अद्यावत प्रमाणपत्र जोडावे.

लखोटा क्रं. २ (व्यापारी लखोटा ):-

०१. व्यापारी लखोटा प्रपत्र क्रं ५ मध्येच भरुन सादर करावा. ( ऑनलॉईन पध्दतीने )

०२. व्यापारी लखोटा सादर करणे बंधनकारक आहे.

०३. निविदेतील प्रपत्र क्र.५ वर दर निश्चित करावे. (ऑनलॉईन पध्दतीने)

**निविदा सादर करणे विषयी अंतिम तारीख :-**

निविदाधारकांनी परिपुर्ण निविदा विहीत कालावधीत संकेत स्थळावरुन ऑनलॉईन सादर करावयाची आहे. तसेच सक्षम प्राधिकरणांने निविदा सादर करण्याचा कालावधी शुध्दीपत्रकाव्दारे वाढविला असल्यास अथवा बदल केलेल्या अटी व शर्ती वगळता पूर्वीच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

लखोटा क्रं. १ तांत्रिक लखोटा उघडणेबाबत :-

लखोटा क्रं १ तांत्रिक लखोटा हा दिनांक ०१ डिसेंबर २०१६ रोजीच्या उद्योग उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील सुचनेनुसार गठित केलेल्या समिती समोर उघडण्यांत येईल. तसेच निविदा धारकांनाही आंमत्रित केले जाईल जर निविदाधारक उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी आपला अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहत असल्याबाबत या कार्यालयास पत्र दयावे जर निविदाधारक उपस्थित राहले नाहीत तर त्यांना सदर प्रक्रियेबाबत तक्रार करता येणार नाही.

लखोटा क्रं १ मधील सर्व कागदपत्रांची समिती मार्फत तपासणी केली जाईल. तसेच समितीने घेतलेला निर्णय अथवा अटी व शर्ती केल्यास त्या निविदाधारकांना बंधनकारक राहतील. तसेच याबाबतचा पुर्ण अधिकार समितीस असतील याबाबत निविदाधारकांना कोणतीही तक्रार करता येणार नाही.

सदरील निविदा प्रक्रिया ही दोन लिफाफा पध्दतीने आहे. लखोटा क्रमांक १ तांत्रिक लखोटयाची छाननी झाल्यानंतर स्पर्धा करीतां लखोटा क्रं. १ चे कमीत कमी तीन लखोटे पात्र ठरले तरच सदर दिवशी लखोटा क्रमांक २ (व्यापारी लखोटा) उघडला जाईल. अथवा लखोटा क्रं. १ पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी ( कार्यालयास आवश्यक वाटल्यास) सनदी लेखापाल यांचेकडुन अथवा संबधित खात्याकडून करुन घेऊन लखोटा क्रं. २ (व्यापारी लखोटा ) उघडण्याबाबत निविदाधारकांना कळविले जाईल. तांत्रिक लखोटयामध्ये मागणी केलेली सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत. कमी कागदपत्रांचा लखोटा अथवा चुकीची कागदपत्रे सादर केलेला लखोटा नामंजूर करुन निविदाधाराकास अपात्र ठरविण्यांत येईल. अशा निविदाधारकांचा व्यापारी लखोटा उघण्यांत येणार नाही. याबाबत निविदाधारकांचा कोणताही आक्षेप/निवेदन ग्राहय धरण्यांत येणार नाही.

निविदा वैधता कालावधी :-

निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लखोटा उघडल्यापासून १२० दिवसांकरिता ग्राहय मानला जाईल. अपवादात्मक परिस्थतीत १८० दिवस राहील. सदरचा वैधता कालावधी या कार्यालयाच्या आवश्कते नुसार व परस्परांच्या संमतीने वाढविला जाईल तो निविदाधारकांस बंधनकारक राहील.

निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदाधारकांच्या तक्रारीबाबत निविदे प्रक्रियेमध्येमध्ये निविदा सादर करणा-या निविदाधारकांवर तक्रार करणा-या तक्रारदास रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी एक लाख रुपये फक्त) इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल जर तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संबधित तक्रारदारांची अनामत रक्कम परत करु । आरोप सिध्द झालेल्या निविदाधारकांस निविदा प्रक्रियेतून वगळण्यांत येऊन त्याची बयाना / अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल. तसेस दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार तक्रारदाराने प्रक्रियेमध्ये सहभागी असणे बंधनकारक आहे. अन्यथा त्रयस्थ व्यक्ती अथवा संस्थेस सदर निविदेबाबत तक्रार सादर करात येणार नाही. निविदापूर्व बैठकीमध्ये निविदाधारकांना असलेल्या शंका उपस्थित करण्यांत ज्या शंका अथवा तक्रारी योग्य असतील त्यांचे निरसन शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यांत येईल व त्यानुसार सदर निविदेमध्ये बदल करण्यांत येतील अथवा सदरच्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. निविदापूर्व बैठकीनंतर आलेल्या शंका अथवा तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

बयाना रक्कम :-

०१. निविदाधारकांना बयाना रक्कम रुपये ५०,०००/- ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक आहे.

०२. ना मंजूर करण्यांत आलेल्या निविदाधारकांची बयाना रक्कम प्रचलित नियमानुसार परत करण्यांत येईल. तसेच निविदाधारकांना बयाना रक्कमेचे कोणतेही व्याज दिले जाणार नाही अथवा निविदाधारक व्याजाची मागणी करुन शकणार नाहीत.

०३. बयाना रक्कम जप्त करणे बाबत :-

अ) निविदाधारक आपला वैधता कालावधी पूर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा कार्यालयास याबाबत निविदाधारकांनी लेखी कळविले गेल्यास

ब) ठेका निश्चित केलेल्या निविदा धारकाने १००/-रु. बॉन्ड पेपरवर करारपत्र न दिल्यास अथवा अनामत रक्कम कार्यालयाकडे १५ दिवसाच्या आत जमा न केल्यास बयाना रक्कम जप्त केली जाईल व त्याबाबत निविदाधारकांस तक्रार करता येणार नाही.

निविदेचे मुल्यमापन :-

०१. गठित करण्यांत आलेल्या समितीमार्फत तांत्रिक लखोटयातील आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली जाईल.

०२. निविदाधारक पात्रतेचे सर्व निकष, निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पूर्ण करण्याबाबतची क्षमता या बाबी निविदा धारकांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे छाननी समिती ठरवेल.

०३. निविदाधारकांकडून निविदा सादर करतांना फसवणूक केलेली आहे का ? अथवा सादर केलेल्या निविदा निविदा धारकांनी परस्परांच्या संगनमताने सादर केल्या आहेत का ? या शहानिशा छानानी समिती मार्फत केली जाईल.

०४. निविदाधारकांची निविदा परिपूर्ण असणे आवश्यक आहे. अपूर्ण कागदपत्रांच्या निविदा नामंजूर करण्यांत येतील सदरच्या निविदांचा व्यापारी लखोटा उघडता येणार नाही. तसेच निविदा धारक आपल्या निविदेची स्थिती संकेतस्थळावर पाहू शकतात.

०५. ज्या निविदा धारकांचा तांत्रिक लखोटा परिपूर्ण असेल त्याच निविदाधारकांचा लखोटा क्र. २ (व्यापारी लखोटा) उघण्यांत येईल. पात्र ठरलेल्या निविदा धारकांना लखोटा क्रं. २ उघण्याबाबत वेळ व दिनाक कळविला जाईल. अथवा सदर निविदेस स्पर्धा होत नसल्यास निविदेमधील अटी व शर्ती शिथील करण्यांचा अधिकार समितीस राहील. याबाबत निविदाधारकास तक्रार करता येणार नाही.

०६. निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांची तपासणी करण्यासाठी मुल्यमापनाचे आवश्यक ते निकष छाननी समिती मार्फत लावले जातील व ते सर्व निकष निविदा धारकांना बंधनकारक राहतील.

०७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, इमारत, वस्तीगृह, ग्रंथालय, रसशाळा तसेच ॲनिमल हाऊस Toilet Building Area अशी वेगवेगळी विभागणी करुन क्षेत्रफळांची वेगवेगळी मापे तयार केलेली आहेत. त्यानुसार शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रसशाळा यांचे सद्यस्थिती कार्यान्वित भागाचे ( Corridor Area , Toilet Area, External Premises area, Built up Area ) क्षेत्रफळ स्केवर फुटामध्ये ६२१३०६.०२ Sq. Ft. असे आहे.

०८. स्वच्छता सेवेची अनामत:-

ज्या निविदाधारकांची निविदा मंजूर होईल त्या निविदाधारकांने स्वच्छता अनामत रक्कम कार्यालयाकडे १५ दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. अनामत रक्कमेचा धनाकर्ष अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांच्या नावे काढण्यांत यावा. तसेच निविदाधारकांने रुपये १००/- च्या स्टॅप पेपर करार करुन देणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने त्याला दिलेला कामाचा ठेका त्यांने व्यवस्थित रित्या पूर्ण केल्यानंतर व संबधीत ठेकेदारावर दंडात्मक कारवाई अगर नुकसान भरपाई नसल्यास तसेच सक्षम प्राधिकरणाने काम समाधानकारक पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतर संबधित ठेकेदारांची अनामत रक्कम परत करण्यांत येईल.

निविदेच्या गोपनियतेबाबत:-

निविदाधारकांने सादर केलेल्या कागदपत्रे तपासणी झाले नंतर, सदर बाबतीत स्पष्टीकरण व दरांचा तुलनात्मक तक्ता, समितीच्या शिफारशी तसेच निविदाप्रक्रियेबाबतची कोणतीही माहिती निविदाधारका व्यतिरिक्त अथवा जे निविदा प्रक्रियेत सहभागी झाले नाहीत अशा कोणत्याही व्यक्तीस अथवा संस्थेस देता येणार नाही अथवा याबाबत हक्क सांगता येणार नाही.

भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवेबाबत:-

भ्रष्ट, फसवणूक अथवा अव्यवहार्य सेवा असणा-या तसेच त्याप्रकारचे आरोप असलेले व अशा प्रकारची माहिती या कार्यालयापासून लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास आपली निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्यांचा अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवला आहे.

महाविद्यालयीन व रसशाळा स्वच्छता कामाची व्याप्ती व स्वरुप:-

१. स्वच्छता गृहे दिवसातून तीन वेळा सकाळी ९.००, दुपारी १२.०० वाजता व सायंकाळी ४.०० तसेच मुलांचे व मुलींचे वस्तीगृहातील स्वच्छतागृहे सकाळी ७.०० वाजता, दुपारी १.०० वाजता व सायंकाळी ६.०० वाजता स्वच्छ करावी लागतील या मध्ये खालील कामे करावी लागतील.
२. सर्व संडास / मुतारी व स्नान गृहाची स्वच्छता करणे, लघवी व संडासचे भांडे स्वच्छ व निर्जतुक करणे.
३. अतंर्गत टाकाऊ पदार्थाची विल्हेवाट लावणे.

४. महाविद्यालय, रसशाळा, ग्रंथालय, व वस्तीगृह आवार व रस्ते दिवसातून एकदा सकाळी ६.०० वा ते सायंकाळी ६.०० या वेळेत किमान तीन वेळा साफसफाई करावी.

५. महाविद्यालय, रसशाळा, ग्रंथालय, व वस्तीगृहामध्ये जमा झालेला कचरा अंतिम विल्हेवाटी साठी योग्य स्थळी पोहचविणे हे करतांना स्वच्छता कवच परिधान करणे क्रम प्राप्त आहे.

६. स्वच्छता सेवक शारिरीक, मानसिक व वैद्यकीयदृष्ट्या पात्र असावा. व कोवीड-१९ विषाणूच्या सारख्या आजारावरील प्रतिबंधात्मक लसीकरणाचे आवश्यक डोस झाल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. व तसेच चारित्र पडताळणी अहवाल पोलीस विभागामार्फत सादर करणे आवश्यक आहे.

७. कामावर असतांना स्वच्छता सेवकांनी निविदाधारक कंपनीचा गणवेश परिधान करणे व गणवेशावर ओळखपत्र लावण बंधनकारक राहील.

८. स्वच्छते करिता, डिटर्जन्ट, डिसईन फेक्टर, फिनाईल इत्यादी योग्य पध्दतीने वापरणे बंधनकारक राहील. रसायनाचे प्रमाणे प्रशासनाने ठरवून दिले प्रमाणे आवश्यक राहील. सर्व कक्षात प्रशासनाने ठरवून दिले प्रमाणे स्वच्छताकरणे आवश्यक राहील. सर्व कक्षात एक आठवडयाचा साठा ठेवणे आवश्यक आहे.

९. रुग्णालय, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, महामंडळे मध्ये स्वच्छता सेवेचा पुर्वानुभव असणा-या कंत्राटदारांना प्राध्यान्य देण्यांत येईल.

१०. महाविद्यालय, रसशाळा, ग्रंथालय, व वस्तीगृहामध्ये स्वच्छतेची गुणवत्ता राहावी याद्दष्टीने खालीलप्रमाणे कामकाजाचे वेळापत्रक करण्यांत यावे व त्यांची नोंद रजिस्टर मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

११. महामारीच्या काळात देखील सेवा देणे बंधनकारक आहे.

१२. स्वच्छता व स्वच्छतासेवेशी संबधित इतर सर्व काम करणे बंधनकारक राहील.

**०१. महाविद्यालय, रसशाळा, ग्रंथालय, व वस्तीगृहामध्ये स्वच्छता वेळापत्रक:-**

| Sr.No. | Time | Subject of Monitoring |
|---|---|---|
| १. | Daily Cleaning of Common areas in the College Building, Pharmacy Building & Library | |
| | ९.०० am | Cleaning, mopping with disinfectant and drying with cobweb removal passage, corridor, Toilet, bathroom, room & Hall |
| | १२.०० Noon | Cleaning, mopping with disinfectant and drying with cobweb removal passage, corridor, Toilet, bathroom, room & Hall |
| | ४.०० pm | Cleaning, mopping with disinfectant and drying with cobweb removal passage, corridor, Toilet, bathroom, room & Hall |
| | Signature of the Mukadam / warden & Librarian in college/Hostel ,Library & Pharmacy should be taken on job card each time after completion work . | |
| २ | Daily Cleaning of Common areas in the Hostel Building | |
| | ७.०० am | Cleaning, mopping with disinfectant and drying with cobweb removal passage, corridor, Toilet, bathroom, warden room |
| | १.०० pm | Cleaning, mopping with disinfectant and drying with cobweb removal passage, corridor, Toilet, bathroom, warden room |
| | ६.०० pm | Cleaning, mopping with disinfectant and drying with cobweb removal passage, corridor, Toilet, bathroom, warden room |
| | Signature of the warden should be taken on job card each time after completion work . | |
| ३. | Toilet cleaning schedule in each shift i.e. morning, afternoon & evening | Scrubbing & Drying of floor. |
| | | Side wall cleaning of floor. |
| | | Wash basin & surrounding area cleaning |
| | | External tap cleaning |
| | | Mirror Cleaning |
| | | Commode & Urinal cleaning |
| | | Exhaust fan, tubelight, switch boards cleaning Cobweb removal |

| | |
|---|---|
| ४. | Dustbin movement twice daily for general waste and as per BMW guidelines for Biomedical waste for all station in College Building, Hostel Building & Library Building & Pharmacy. |
| Signature of the Mukadam / warden & Librarian in college/Hostel ,Library & Pharmacy should be taken on job card each time after completion work. | |
| ५. | Sufficient stock detergents, disinfectants, sodium hypochlorite etc to be monitored by under supervision of AO/OS. |
| ६. | Whether brooms, manpower, floor scrubbers supplied by contractor are in sufficient quality to monitored by A.O/O.S. |
| ७. | Whether contract sweepers are with uniforms supplied by contractor to be monitored by A.O./O.S |
| ८. | Whether identity cards and protective Cloth supplied by Contractor to be monitored by A.O./O.S |
| ९. | Whether three doses of Hepatitis B vaccine administered to contract sweepers with record monitored by Liberian, Hostel superintendent/warden/HOD |
| १०. | Whether monthly meeting of executive committee of college conducted to monitor quality to services and review problems and they are put in Governing body meeting of college to be monitored by O.S/A.O./DEAN. |
| ११. | Contract cleaning staff be trained in BCC (Behavior Change Communication) every year through college training center to be monitored by Medical officer Hospital training center. |

वरील वेळा पत्रकाप्रमाणे सर्वत्र स्वच्छता सेवा करणे आवश्यक आहे.

स्वच्छता सेवेत कुचराई अथवा असमाधानकारक आढळल्यास खालील प्रमाणे दंड आकारण्यांत येईल व त्याची वसुली ठेकेदारच्या देयकातून वसूली केली जाईल.

| Sr. No | Description | Penalty per day per event per Location |
|---|---|---|
| १ | Not maintaining daily or weekly cleaning time table | Rs.५००/- |
| २ | Not obeying orders of staff or non-satisfactory work | Rs.५००/- |
| ३ | Not maintain cleaning timetable | Rs.५००/- |
| ४ | Inadequate stock of disinfectant & detergent etc. | Rs.५००/- |
| ५ | Non supply of items for cleaning to worker | Rs.५००/- |
| ६ | Non supply of uniform to worker | Rs.५००/- |
| ७ | Non maintain of Health Check-up timetable of worker | Rs.५००/- |
| ८ | Non Vaccination of Worker | Rs.५००/- |
| ९ | Every compliant of staff regarding inappropriate ( After verification ) | Rs.५००/- |
| १० | Appointment of child labour | Contract will be terminated |

कार्यालयाकडून कंत्राटदारांना पुरविण्यांत येणा-या सोयी:-

०१. स्वच्छतेसाठी लागणारा पाणी पुरवठा करणे.

०२.साफसफाईचे साहित्य ठेवणेकरीता एक स्टोअर रुम.

कंत्राटदारांकडून कंत्राटी कर्मचा-यांना पुरावयाच्या वस्तू :-

०१. कंत्राटी कामगारांना गणवेश व ओळखपत्र

०२. स्वच्छता कवच

०३. स्वच्छता करण्यासाठी निगडीत सर्व उपभोग्य वस्तू जसे डिटरजेंन्ट. डिसईनफेक्टर, फिनाईल इत्यादी तसेच सुरक्षा साधने ही कंत्राट दाराने पुरवावे महाविद्यालया कडून अशा प्रकारची कुठलीही साधन सामुग्री पुरविली जाणार नाही.

स्वच्छता सेवेचा सनियंत्रण :-

खालील सदस्यांची समिती स्वच्छता सेवेची गुणवत्ता पडताळणी करतील.

१. प्रशासकीय अधिकारी

२. ग्रंथपाल

३. कार्यालयीन अधिक्षक

४. वसतिगृह अधिक्षक

५. मुकादम

या शिवाय स्वच्छतेच्या कामाची पाहणी अचानक पणे केव्हाही केली जाईल व त्या बाबतचे अभिप्राय नोंदविले जातील. तसेच असमाधानकारक स्वच्छते बाबत समज देण्यांत येईल व कामात सुधारणा न दिसून आल्यास ती कामे उपलब्ध अन्य एजन्सीकडून / ठेकेदारांकडून/मनुष्याकडून करुन घेवून त्याचा पूर्ण खर्च ठेकेदाराच्या अनामत रक्कमेतून / देय होणा-या देयकातून वसूल केला जाईल. कंत्राटदाराच्या सेवा मार्गदर्शन सुचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास त्या कुठल्याही क्षणी रदद करण्याची शिफारस महाविद्यालयीन प्रमुखाकडे करतील. अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेली हमी रक्कम / अनामत रक्कम रदद करण्यांत येईल.

ठेकेदारांना द्यावयाचा मोबदला व वेतन अदा करणे बाबत:-

- ठेकेदारास दर महा देय असलेला मोबदला अनुदान उपलब्ध असल्यास सदर महिन्याच्या १५ तारखेस नियमानुसार आयकर,सरचार्ज, टिडीएस, एज्युकेशन टॅक्स अथवा अनुषंगीक कर कपात करुन देण्यांत येईल. शासनामार्फत अनुदान उपलब्ध होईल पर्यंत संबधित कर्मचा-यांचे वेतन अदा करणेची जबाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.
- तसेच वेतन मिळणेबाबत या कार्यालयावर संप पुकारण्याचा अधिकार राहणार नाही. त्याची जबाबदारी संबधित ठेकेदाराची राहील किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटी कर्मचा-यांना वेतन अदा करणे, देय वेतन वेळेवर अदा करणे, तसेच लागू असणा-या सर्व कामगार कायद्यांचे पालन करणे ( कंत्राटी कामगार अधिनियम१९७०), जीवन विमा विषयक व सर्वसाधारण विमा विषयक बाब ही सर्वस्वी संबधित ठेकेदाराची जबाबदारी राहील.
- भ.नि.नि. वर्गणी कामगारांचे खाती जमा केल्याचे चलन कार्यालयात जमा करणे बंधनकारक तसेच दरमहा कंत्राटी कामगाराचे वेतन राष्ट्रीय कृत बँकेत कर्मचा-यांचे खाते उघडून जमा करण्यांत यावे व सदरचे वेतन अदा केले नंतर सदर वेतनपटाची एक प्रत आठ दिवसाच्या आत कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
- संबधित कंत्राटी कर्मचा-यांना कंत्राटी स्वरुपात काम दिले म्हणजे शासनाचे कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाहीत . तसेच शासन सेवेत कोणताही हक्क राहणार नाहीत.
- शासकीय आयुर्वेदिक व युनानी रसशाळेसाठी स्वंतत्र करारपत्र करावे लागेल तसेच त्या संस्थेस स्वच्छतेच्या कामाचे स्वंतत्र देयक सादर करणे बंधनकारक आहे.

अटी व शर्ती :-

१. निविदा धारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रत्येक पानावर त्यांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे.

२. ज्या निविदाधारकांनी अर्ज डाऊनलोड केला असेल त्यांनाच तो भरता येईल.

३. संबधित कंत्राटी कर्मचा-यांना कंत्राटी स्वरुपात काम दिले म्हणजे शासनाचे कोणतेही लाभ अनज्ञेय होणार नाहीत. तसेच शासन सेवेत कोणतेही हक्क राहणार नाही. याबाबत ठेकेदारांने संबधित कंत्राटी कर्मचा-यांना लेखी पूर्व कल्पना द्यावी. याबाबत न्यायालयीन प्रकरण झाल्यास याची जबाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.

४. कामावर असतांना कोणतीही दुर्घटना झाल्यास व कंत्राटी कर्मचा-यास दुखापत / मृत्यु झाल्यास सदरची नुकसान भरपाई / मोबदला देण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील. तसेच सदर प्रकरणी न्यायप्रविष्ठ बाबी, अथवा वाद निर्माण झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारची राहील. या अनुषंगाने नियमानुसार योग्य तो विमा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई / अधिष्ठाता कार्यालय कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

५. सुशिक्षित बेकार स्वंयरोजगार सहकारी संस्था यांना बयाना रक्कमेत सुट असल्यास तालुका अथवा जिल्हायाच्या निबंधकाकडून (सहकारी संस्था) त्या संस्थेच्या नावानिशी अनुमती पत्र जोडावे.

६. मागासवर्गीय संस्था /अपंग संस्था यांना बयाना रक्कम सुट मागावयाची असल्यास त्या संस्थेच्या नावानिशी शासन निर्णयाची प्रत अथवा सक्षम प्राधिकरणाचे पत्र जोडावे.

७. एकदा निश्चित झालेले दर पुन्हा वाढविता येणार नाहीत. ( ठेका दिलेल्या तारखेपासून ठेका निश्चित तारखेपर्यंत अथवा परस्परांच्या संमतीने वाढविण्यांत आलेल्या कालावधी पर्यंत)

८. मंजूर निविदेची मुदत निविदा मंजूर झालेल्या Work order दिल्यापासून पुढे एक वर्षापर्यंत वैध राहील. कालावधी संपल्यानंतर नवीन निविदा अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास त्या कालावधीत सध्याच्याच अटी व शर्ती नुसार दोघांच्या संमतीने एक महिन्याच्या कालावधीसाठी किंवा पुढील निविदा अस्तित्वात येईपर्यंत चालू करार ठेवण्यांत येईल.

९. ठेकेदाराने पुरविलेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन दरमहा ५ तारखेच्या आत राष्ट्रीयकृत बँकेतील त्यांच्या खातेवर धनादेशाव्दारे जमा करावेत व सदर रिसिटची छायांकित प्रत कार्यालयास जमा करावी.

१०. ESIC व PF प्रत्येक महिन्यात कामगारांच्या नांवे जमा करणे आवश्यक राहील व त्याची ऑनलाईन प्रत कार्यालयास जमा करणे आवश्यक राहील. सदरची प्रत कार्यालयास प्राप्त झाले नंतरच संबधित ठेकेदाराचे देयक अदा करण्यांत येईल.

११. मंजूर निविदाधारकांने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकांची राहील.निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पुर्व सुचने शिवाय कंत्राट रदद करण्यांत येईल आणि मंजूर निविदा धारकांचे नांव काळया यादी घालून हमी रक्कम (सिक्युरिटी डिपॉझिट) जप्त करण्याबाबतची कारवाई करण्यांत येईल.

१२. निविदा अर्ज कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे, रदद करणे तसेच निविदा उघडण्याच्या तारखेत व वेळेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवले आहेत.

१३. स्वच्छता सेवा पुरविणे करीता आवश्यक त्या सर्व वस्तू व साधन सामुग्री ठेकेदारामार्फत कंत्राटी कर्मचा-यांना पुरविल्या जाणे बंधनकारण राहील.

१४. कंत्राटी कर्मचा-यांनी महाविद्यालयातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास याची भरपाई संबधित ठेकेदारास देय होणा-या रक्कमेतून वसूल केली जाईल.

१५. निविदा मंजूर झाल्यानंतर करारनामा रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर अथवा आवश्यक त्या रक्कमेचा ( स्वखर्चाने) वेगळा करावा लागेल. तसेच अनामत रक्कम रु १,५०,०००/- (अक्षरी एक लाख पन्नास हजार रुपये फक्त ) म्हणून अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड यांचे नांवे धनाकृषाव्दारे जमा करावी लागेल. कंत्राटदाराने त्याला दिलेल्या कामाचा ठेका त्याने व्यवस्थितरीत्या पूर्ण केल्यानंतर व संबधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई अगर नुकसान भरपाई नसल्यास संबधित ठेकेदाराची सिक्युरिटी डिपॉझिट परत करण्यांत येईल.

१६. शासनास येणा-या क्षेत्रफळाप्रमाणे स्वच्छता सेवेच्या खर्चाच्या अधिन राहून उदा. नियमित कर्मचा-यांचे वेतन व भत्ते या वर होणारा खर्च व स्वच्छता सेवा देण्याकरिता लागणा-या सामुग्रीवरील खर्चाच्या अधिन राहून व मा. कामगार आयुक्त यांचे प्रचलित किमान वेतनानुसार निविदेचा दर विचारात घेतला जाईल.

१७. स्वच्छता निविदा धारकांने अटी व शर्तीचा भंग केल्यास त्यांची जबाबदारी निविदा धारकाची राहील निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्यास पूर्व सूचने शिवाय कंत्राट रदद करण्यांत येईल आणि मंजूर निविदा धारकांचे नांवे काळया यादीत घालून बँक गॅरंटी ( सिक्युरिटी डिपॉझिट ) जप्त करण्यांत येईल.

१८. स्वच्छता सेवा पुरविणे करीता मागविण्यांत आलेल्या ई-निविदा तीन पेक्षा कमी प्राप्त झाल्यास अथवा प्राप्त झालेल्या निविदेतील पात्र निविदा धारक तीन पेक्षा कमी असले तर निविदेस मुदतवाढ देण्यांत येईल.

१९. कोणतीही निविदाकार किंवा संभाव्य निविदाकार, जेव्हा खरेदी कार्यालयाचा कोणताही निर्णय, कृती किंवा खरेदी कार्यालयाकडून वगळण्यांत आलेला नियम किंवा मार्गदर्शक सुचनांमुळे बाधित झालेला असेल तर तो अशा निर्णय किंवा कृतीच्या दिनांकापासून दहा (१०) दिवसांच्या कालावधीत किंवा पूर्व-अर्हता दस्तावेज, निविदाकार नोंदणी दस्तवेज किंवा निविदा दस्तावेजा मध्ये विनिर्दिष्ट करण्यांत आलेल्या अशा अन्य कालावधीत,अशा निर्णयाचे किंवा कृतीचे, जसे असेल तसे, पुनर्विलोकन करण्यासाठी खरेदी कार्यालयाकडे तो, त्यामुळे बाधित झाला आहे, असे त्यास वाटते असे विशिष्ट कारण किंवा कारणे स्पष्टपणे नमुद करुन अर्ज सादर करेल.

अ) परंतू, असे की, निविदाकाराला यशस्वी म्हणून घोषित करण्यांत आल्यानंतर पुनर्विलोकनासाठी अर्ज फक्त अशा निविदाधारकाकडून दाखल करण्यांत येऊ शकेल ज्याने स्वच्छता कामकाजात भाग घेतलेला असेल.

ब) परंतू, आणखी असे की, जर सेवा कार्यालयाने व्यापारी लखोटा निविदा उघडण्यापूर्वी तांत्रिक निविदेचे मुल्यांकन केले असेल, तर व्यापारी निविदेशी संबधित पुनर्विलोकनासाठी अर्ज फक्त अशा निविदाकारांकडून दाखल करता येऊ शकेल ज्यांची तांत्रिक निविदा स्विकारार्ह असल्याचे आढळून आले असेल.

२०. प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा कोणतेही कारण न दर्शविता स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवला आहे.

२१. सदरील संस्था वैद्यकीय सेवा पुरविण्याचे काम करीत असते करिता ठेका कालावधीत कोणत्याची विषाणूचा प्रादुर्भाव झाला तरी ठेकेदारास कंत्राटी सेवा अविरत पुरविणे बंधनकारक राहील.

२२. निविदेमध्ये दर्शविण्यांत आलेले क्षेत्रफळ कमी किंवा जास्त करण्यांचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवला आहे.

२३. महिलाकरीता आसलेली स्वच्छता गृहे स्वच्छ करणेसाठी महिला कामगार असणे बंधनकारक आहे.

२४. कामगार कायद्यांच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड

प्रपत्र-१

निविदा अर्ज

प्रति,

मा. अधिष्ठाता,

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,नांदेड

विषयः- स्वच्छता सेवा कामाची निविदा अर्ज सादर करणे बाबत......

महादेय,

उपरोक्त विषयानुसार आम्ही सर्व आवश्यक ती कागदपत्रे तपासून निविदे सोबत सादर करीत आहे ( तांत्रिक लखोटयात मागणी केले प्रमाणे ) खाली सही करणा-यांना निविदेतील सर्व नियम व अटी माहिती असून त्या सर्व अटी व नियम आम्हांला बंधनकारक असून त्या आम्हांला मान्य आहेत. निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचून आम्ही वरील विषयांकित सेवा पुरविणे या कामाची निविदा सादर केलेली आहे. वरील विषयांकित सेवेचा दर लखोटा क्रं.२ मध्ये ( ऑनलाईन पध्दतीने) सादर केलेली आहे. लखोटा क्रं. २ हा निविदेचा एक अत्यंत महत्वाचा भाग आहे.

जर खाली सही करणा-यांची निविदा मंजूर झाली तर निविदेत स्पष्ट केले प्रमाणेकामाचे स्वरुप व व्याप्ती प्रमाणे तसेच सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सेवा देण्यास मी/आम्ही बांधील राहू व आमची तक्रार असणार नाही.

जर खाली सही करणा-यांची निविदा मंजूर करण्यांत आली तर आम्हांला निविदेतील नियमाप्रमाणे देय असलेली अनमात रक्कम रु....... धनाकर्षाव्दारे १५ दिवसात देणे आम्हांला बंधनकारक आहे व सदर बाबतीत आमची तक्रार असणार नाही.

आम्हांस निविदेच्या एक वर्षाच्या कालावधीमध्ये तसेच निविदेमध्ये नमुद केलेल्या दरांप्रमाणे ( कामगार कायद्यांचा भंग न करता) व कामाच्या स्वरुप व व्याप्ती नुसार सेवा पुरविणेस आम्हांस बंधनकारक राहील. सदरच्या कालावधी करीताखालील सही करणार हे सर्व नियम व अटीनुसार सेवा पुरविणेस बांधिल राहतील.

जो पर्यंत अंतिम निविदा तयार होऊन ती परस्परांच्या संमतीने कार्यान्वित होत नाही. तोपर्यंत तुम्ही ( निविदा स्विकारणारे ) सदरच्या प्रक्रियेस बांधील नाही. तसेच खाली सही करणार यांना हे माहिती आहे. की सदरची निविदा प्रक्रिया अंतिम होत नाही तोपर्यंत तुम्ही ( निविदा स्विकारणारे ) बांधिल नसून तुम्ही अन्य कोणत्याही निविदा स्विकारु अथवा नाकारु शकता.

निविदा धारकाची सही व शिक्का

दिनांक

टिपः- सदरच्या अर्जावर सही करुन डाऊनलोड केलेल्या निविदा संचावर ( पान नंबर सह) सही व शिक्यासह सोबत शपथपत्र ( प्रपत्र -४) + मुळ सॉलव्हन्सी प्रमाणपत्र + तांत्रिक लखोटयात मागणी केलेल्या सर्व कागदपत्राची छायांकित प्रती दिनांक / /२०२२ च्या वेळ ११.५९ वाजपर्यंत ऑनलॉईन सादर करणे आवश्यक आहे.

प्रपत्र-२

PROFORMA FOR PAST PERFORMANCE STATEMENT

( For a period last 3 years) i.e. २०१९-२०,२०२०-२१,२०२१-२२

सेवा देत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता :-

| अ.क्र. | सेवेचे नांव | सेवा घेत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता | आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी | सेवा घेत असलेल्या संस्थेचा अभिप्राय | सेवा घेत असलेल्या संस्थेकडील शिक्का व संस्था प्रमुखाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

ANNEXURE -३

ANNUAL TURN OVER STATEMENT FOR THREE YEARS

( For a period last ३ years) i.e. २०१९-२०,२०२०-२१,२०२१-२२

The annual Turnover of M/s ------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------- for the past

three years are given below and certificated that the statement is true and correct.

| Sr. no. | Year | Turnover Rs. In Lakhs |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |

Date :

Seal :

Chartered Account

Name ( in Capital letters)

Signature of Auditor

प्रपत्र-४

१००/- रु. बॉन्डवर शपथपत्र

मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. तह............................ जि. ....................: यांचे समोर....................

प्रतिज्ञापत्र लिहून देणार ......................................... वय .................... धंदा...............................

पत्ता..............................................................

मी सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करतो की,

वरील पत्यावरचा कायमचा रहीवाशी असून अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांचे सर्व विभागात, स्वच्छता सेवा या कामाची निविदा भरलेली असून सदरच्या निविदेमध्ये नमूद केलेले दर हे प्रचलित कामगार कायदा व किमान वेतन देण्यास बांधील आहे. तसेच मी / आम्ही नमुद केलेले दर शासनाकडून नियमित कर्मचा-यांची नेमणूक केली असती तर त्याला देय असणा-या वेतनापेक्षा कमी असतील. सदरचे जादा दर झाल्यास माझी निविदा नामंजुर करण्यांत येईल याची मला कल्पना आहे.

मी शासकीय, निमशासकीय, खाजगी कॉन्ट्रॅक्टची कामे घेतली असून ती ज्या ज्या ठिकाणी कामे घेतलेली आहेत ती कामे व्यवस्थितरीत्यापूर्ण केलेली आहेत. आजपर्यंत कोणतेही काम अपुरे सोडलेले नाही. यामुळे अथवा इतर कारणामुळे शासनाच्या कुठल्याही विभागामध्ये माझे नांव काळया यादीमध्ये नाही. ही वस्तुस्थिती खरी व बरोबर आहे. माझे वर फसवणुक, अफरातफर, दंडदोष गुन्हा नोंद नाही. तसेच मला कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही गुन्हया खाली शिक्षा केलेली नाही.

ताजिक लखोटया मधील ( लिफाफा क्र.१ ) निविदेमध्ये प्रसिध्द केले प्रमाणे आवश्यक कागदपत्रे मी सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रे अपूर्ण अथवा चुकीची असल्यास माझी निविदा नामंजूर करण्यांत येईल याची मला कल्पना आहे. या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

सदरचे प्रतिज्ञापत्र हे मी किमान वेतन कायद्याचा भंग करणार नाही तसेच मी शासनाच्या कुठल्याही काळया यादीमध्ये समाविष्ठ नसल्याबाबत व माझावर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा नोंद नसले बाबत मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड यांचे कार्यालयात हजर करणे कामी केले आहे. वरील सर्व माहीती खरी व बरोबर असून सत्य आहे ती खोटी ठरल्यास मी भारतीय दंडविधान संहीतेतील कलम १९९, २०० व १९३ (२) नुसार होणा-या शिक्षेस व दंडास पात्र राहील. म्हणून केले सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट आज मु------------------

दिनांक

प्रपत्र-५

वार्षीक ठेका

सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी आवश्यक असणा-या अवैद्यकीय सेवेवरील

( स्वच्छता सेवा ) संभाव्य दरांचा विश्लेषणात्मक तक्ता

१) अवैद्यकीय सेवेचा प्रकार :- स्वच्छतासेवा

२) निविदाधारकांचे नांव :- ------------------------------------

| Sr. No | College Name | Minimum Man Power | Toilet | Building area | Total Area (Sq.ft.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | Govt. Ayurved College Nanded | | १४६१.६३ | ५०७०६.६३ | ५२१६८.२६ |
| २ | Library Building | | २७२.९७ | १९४६०.१८ | १९७३३.१५ |
| ३ | Post Graduate Boys /Girls Hostel | | ३३६०.१८ | ३६०६७.५९ | ३९४२७.७७ |
| ४ | U G Boys Hostel | | २१६२.२५ | २५२०४.३४ | २७३६६.५९ |
| ५ | U G Girls Hostel | | ११४४.४१ | २८३१३.२७ | २९४५७.३७ |
| ६ | Pharmacy Building | | ९७३.७० | ४८९७३.८५ | ४९९४७.५५ |
| ७ | Animal House | | ४८६.८५ | ३७२१.९४ | ४२०८.७९ |
| ८ | खुला परिसर | | -- | -- | ३९८९९६.२३ |
| | एकुण | | ९८६१.९९ | २१२४४७.८ | ६२१३०६.०२ |

टिप:- वरील दर हे सर्व बाबींच्या क्षेत्रफळाचा विचार करुन एकत्रित प्रति चौरस फुट दर नमुद करणे बंधनकारक आहे.

१. वरील दर हे सर्व कर व स्वच्छता सेवेकरीता आवश्यक उपभोग्य वस्तू व साधन सामुग्रीसह समाविष्ठ असावेत. तदनंतर ठेकेदाराकडून अतिरिक्त अथवा वेगळया कराची मागणी करता येणार नाही.

२. वरील दर हे प्रति चौरसफुटाप्रमाणे असले तरी आवश्यक असलेल्या कक्षात, विभागामध्ये मनुष्यबळ उपलब्ध करणे बंधनकारक राहील व याबाबतचा वेगळा दर देण्यांत येणार नाही. सदरचा खर्च हा वरील दरामध्य समाविष्ठ करणे आवश्यक राहील.

३. महाविद्यालयाचे क्षेत्रफळ निविदाधारकांने स्वतः खात्री करण्याचे आहे.

४. वित्त विभाग परिपत्रक क्रं.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा- मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक ०२ डिसेबर २०१३ व महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.२९/वित्तीय सुधारणा-१ दिनांक ०२ ऑगस्ट २०१६ च्या शासन निर्णयातील बाहययंत्रणे कडून ( आऊट सोर्सिंग व्दारे ) कामे करुन घेण्याबाबतच्या मार्गदर्शक सुचनाचे पालन करुन समिती मार्फत अंतिम निर्णय घेण्यांत येईल व सदरचा निर्णय ठेकेदारांचा बंधनकारक राहील.

५. निविदाधारकांनी दर हे दिलेल्या BOQ फाईल मध्येच नमूद करावे.

- GST as per Govt. Rules should be paid by tendere.
- Rate Quoted in Tender From are considering the provisions of minimum wages act १९४८ EPF Act, Employee provident fund act, ESIC Act & Other applicable laws.

Annexure-६

## FORMAT FOR BANK GUARNTEE FOR E.M.D.

Whereas ------------------------------( Here in after called " the Tender off" ) has submitted dated -- ------------- ( Dated of Submission of bid ) for the supply of ------------------ ( Name and / of Country) , having our registered office at ---------- ( address of bank ) ( Hereinafter called "the Bank"), are bound unto --- ----------------------- (Name of Purchaser ) Hereinafter called the purchaser") in the sum of ----------------- ----------------- for which payment well and truly to be made to the said purchaser, the Bank binds itself, its successor, and assigns by these presents Sealed with the Common Seal of the Band this ---------- day of ---- ---------------------२०----------

THE CONDITIONS of the obligation are:

१. If the Tenderer

(a) Withdraws its tenders during the period of tender validity by the tenderer in his tender; or

(b) Does not accept the correction of errors in accordance with the instructions to to tenderers;

Or

२. If the Tenderer, having been notified of the acceptance of its tenders by the purchaser during the periods of tender validity;

(a) Fails or refused to execute the Contract Agreement if required; or

(b) Fails or refused to furnish the Security deposit , in accordance with the terms and conditions stipulated in the tender document;

We undertake to payu the Purchaser up to the above amount upon of its first written demand. Without the Purchase having to substantiate its demand, provided that in its demand the Purchaser will not that the amount claimed it is due to it, owing to the occurrence of both of the two conditions, specifying the occurred condition or conditions.

The guarantee will remain in force up to and including forty fie ( ४५) days after the period of the tender validity, and demand in respect thereof Should reach the Bank not later than the above date.

-------------------------

( Signature & Seal of the Bank )

निविदा धारकाकरिता निविदा सादर करणे करीता महाविद्यालयातील मोजमापाची माहिती

| Sr. No | College Name | Minimum Man Power | Toilet | Building area | Total Area (Sq.ft.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | Govt. Ayurved College Nanded | | १४६१.६३ | ५०७०६.६३ | ५२१६८.२६ |
| २ | Library Building | | २७२.९७ | ११४६०.१८ | ११७३३.१५ |
| ३ | Post Graduate Boys/ Girls Hostel | | ३३६०.१८ | ३६०६७.५९ | ३९४२७.७७ |
| ४ | U G Boys Hostel | | २१६२.२५ | २५२०४.३४ | २७३६६.५९ |
| ५ | U G Girls Hostel | | ११४४.४१ | २८३१३.२७ | २९४५७.३७ |
| ६ | Pharmacy Building | | ९७३.७० | ४८९७३.८५ | ४९९४७.५५ |
| ७ | Animal House | | ४८६.८५ | ३७२१.९४ | ४२०८.७९ |
| ८ | खुला परिसर | | -- | -- | ३९८९९६.२३ |
| | एकुण | | ९८६१.९९ | २१२४४७.८ | ६२१३०६.०२ |

वरील सर्व मोजमापे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेतलेली आहेत.